**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विजय चंद्रकांत अत्रे
रा.११३३, कसबा पेठ, भोई आळी, जनार्दन तिकोने वाडा, पुणे-४११०११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (२),
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष/सचीव, राज्य सरकारी नोकर
सहकारी ग्राहक वस्तु भांडार(मर्यादित)
सेंट्रल बिल्डिंग आवार, पुणे ४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विजय चंद्रकांत अत्रे
रा.११३३, कसबा पेठ, भोई आळी, जनार्दन तिकोने वाडा, पुणे-४११०११

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (२),
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष/सचीव, राज्य सरकारी नोकर
सहकारी ग्राहक वस्तु भांडार(मर्यादित)
सेंट्रल बिल्डिंग आवार, पुणे ४११००१

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.३.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>(१) 'राज्य सरकारी नोकर सहकारी ग्राहक वस्तु भांडार' या संस्थेचे नोंदणीपत्र, वर्गवारी व यानुसार संस्थेने पालन करावयाचे नियम/कायदे/मार्गदर्शक तत्वे इ. व संस्थेची मूळ घटना, दूरध्वनी क्रमांक, राबवीत असलेले उपक्रम (संपूर्ण माहिती), उपक्रम बंद पडले असल्यास त्याबाबत कारणे, जबाबदार व्यक्तींची नावे. कालावधी दि.१ जानेवारी १९८७ ते डिसेंबर १९९३ अखेर<br>(२)संस्थेच्या अखत्यारीतील सेंट्रल बिल्डिंग आवारात असलेल्या 'हॉटेल सहकार ' बाबत दि.१ जानेवारी १९८७ ते ३१.१२.२००५ पर्यंतची सर्व माहिती<br>(३)श्री.खंडेराव अंबादास कुलकर्णी, रा.पुणे या इसमाचा 'हॉटेल सहकार 'शी काय संबंध आहे याबाबतची सर्व माहिती.<br>(४)सध्या 'हॉटेल सहकार' चालवीत असलेला कंत्राटदार हॉटेलसाठी वापरत असलेली सर्व मालमत्ता नक्की कोणाचे मालकीची आहे? तसेच त्याची संपूर्ण यादी, खरेदीची बिले व त्याच्या पावत्या इ.तपशीलवार कागदपत्रे | |

## विवेचन

'राज्य सरकारी नोकर सहकारी ग्राहक वस्तु भांडार ' (म.), पुणे या संस्थेबाबतची विविध स्वरुपाची माहिती अपीलकर्ता श्री.अत्रे यांनी मागितली होती. संस्थेच्या 'हॉटेल सहकार'च्या संदर्भातील करार, दस्तऐवज यांचा त्यात प्रामुख्याने समावेश होता. संस्थेचे सचीव श्री.अशोक शिंदे यांनी श्री.अत्रे यांना विहित नमुन्यात अर्ज करण्याबाबत कळविले, तसेच 'संस्थेचे सर्व दफ्तर लेखा परीक्षणासाठी दिले असल्यामुळे आपल्या अर्जावर लेखापरीक्षण झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल. त्याचप्रमाणे आपल्या अर्जात नमूद केलेली माहिती मिळविण्यासाठी संस्थेस प्रचंड यंत्रणा राबवावी लागणार असून त्यासाठी वेळही भरपूर लागणार आहे. तरी त्यासाठी संस्थेस पुरेसा वेळ द्यावा ही विनंती,'असेही त्यांनी नमूद केले. त्यानंतर श्री.अत्रे यांनी उपनिबंधक संस्था(२), पुणे

यांच्याकडे अर्ज केला. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (२) यांच्याकडे श्री.अत्रे यांनी हीच माहिती मागितली होती, परंतु अशा स्वरुपाची माहिती उपनिबंधक कार्यालयात ठेवणे अपेक्षित नाही व मुद्दा क्र.(इ) मध्ये नमूद केलेल्या स्वरुपाची कोणतीही कार्यवाही केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही, असे त्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी श्री.अत्रे यांना कळविले. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ३२(२) अन्वये संबंधित कागदपत्रांच्या प्रती देण्याची सूचना उपनिबंधकानी अध्यक्ष/सचीव, राज्य सरकारी नोकर सहकारी ग्राहक वस्तु भांडार (म.), पुणे यांना केली. मात्र श्री.अत्रे हे संस्थेचे सभासद नाहीत, अधिनियमातील कलम ३२(२) अन्वये फक्त सभासदांनाच माहिती देण्याची तरतूद असल्यामुळे त्यांना ही माहिती देता येणार नाही, असे संस्थेने त्यांना कळविले. श्री.अत्रे यांनी उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (२) यांच्या कार्यालयाकडे त्याविरुध्द अपील केले. परंतु संबंधित संस्थेला भरीव शासकीय अर्थसहाय्य मिळत नसल्यामुळे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, असे नमूद करुन त्यांचे अपील अपिलीय प्राधिकाऱ्यांनी फेटाळले.

दरम्यानच्या काळात श्री.अत्रे यांनी विविध पातळ्यांवर व्यापक प्रमाणात पत्रव्यवहार केला, परंतु आवश्यक ती माहिती त्यांना कोठूनही मिळाली नाही, म्हणून श्री.अत्रे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.अत्रे यांनी अर्ज केला तेव्हा केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुकताच अस्तित्वात आला होता व विहित नमुन्यात अर्ज आवश्यक आहे असा आमचा समज होता, त्यामुळे तसे पत्र दिले. श्री.अत्रे यांचे अर्ज कधी सर्वसाधारण स्वरुपाचे, तर कधी माहितीच्या अधिकाराखाली असल्याचे ते म्हणत राहिले. मात्र शासनामार्फत आमच्या संस्थेला कोणतीही आर्थिक मदत मिळत नाही व संस्था संस्थेच्या सभासदांच्या भांडवलावर काम करते, असे संस्थेचे सचीव श्री.अशोक शिंदे यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. मात्र ही संस्था / हॉटेल सहकार सरकारी इमारतीत व सरकारी सेवकांची आहे, त्यामुळे खाद्यपदार्थ स्वस्त दरात देण्यासाठी त्यांना सबसिडी मिळते, तसेच जागेला सवलतीचे भाडे आहे, त्यामुळे केंद्रिय माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ संस्थेला लागू होतो, असे प्रतिपादन श्री.अत्रे यांनी केले. संस्थेला कोणतीही आर्थिक व अन्य सवलत शासनाकडून मिळत नाही. बांधकाम खात्याने ठरविलेले भाडे संस्था व्यावसायिक दराने भरीत आहे. या भाड्याबाबत संस्थेने दाखल केलेला दावा उच्च न्यायालयात प्रलंबित आहे, असे श्री.शिंदे यांनी नमूद केले. अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे (२) श्री.एस.पी.चव्हाण यांनी त्याला दुजोरा दिला.

'हॉटेल सहकार'च्या मालकीच्या व थकबाकीच्या संदर्भात आपल्यावर अन्याय झाल्याचे श्री.अत्रे यांचे म्हणणे आहे. त्या अनुषंगाने विविध पातळ्यांवर ते दाद मागत आहेत. त्यासाठी आपल्याला संबंधित कागदपत्रे आवश्यक आहेत, असे श्री.अत्रे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. संस्थेने भाड्याचा भरणा नियमितपणे न करणे, त्याबद्दल संस्थेवर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कारवाई होणे, जागा अन्य व्यक्तींना कंत्राट पध्दतीने भाड्याने देऊन पावत्या न देता बिनव्याजी अनामत रक्कम व भाडे वसूल करणे इ. स्वरुपाचे आरोपही श्री.अत्रे यांनी आयोगाला सादर केलेल्या विस्तृत निवेदनात केले आहेत. परंतु केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत त्याचा विचार करता येणार नाही.

संबंधित संस्थेला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या भरघोस आर्थिक सहाय्य मिळत असल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन सिध्द होत नाही. त्यामुळे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार माहिती देणे संस्थेला बंधनकारक म्हणता येणार नाही.

मात्र संस्थेला नाममात्र भाड्यासारखी कोणतीही कायमस्वरुपी सवलत मिळत असल्यास केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती देणे संस्थेवर बंधनकारक राहील.

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. ८.१.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, ( पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे - ४११ ००१

श्री. नेमचंद तुळशीराम काळे
शिवनेरी सह. गृहरचना संस्था मर्या.,
एमआयडीसी, बारामती, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
तहसीलदार, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
नायब तहसीलदार, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. नेमचंद तुळशीराम काळे , शिवनेरी सह. गृहरचना संस्था मर्या., एमआयडीसी, बारामती, ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
श्री. बाबासाहेब भाऊसाहेब वाघमोडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.३.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. ति-हे, ता. उत्तर सोलापूर येथील गट क्र. २९६.ब/१ हा तहसीलदार, उत्तर सोलापूर यांचेकडील आदेश क्र.एलएनडी/एलएनएएसआर/७/९१ दि. ११.१०.१९९१ अन्वये बिगरशेती केली आहे त्या आदेशाची प्रत, नकाशा प्रमाणित प्रत
२. क्र.वतन/कावि/५०५/२००५ दि. २२.९.२००५ प्रमाणे मागवलेली माहिती संबंधित कार्यालयाकडून प्राप्त झाली असल्यास त्याच्या उत्तराची प्रमाणित प्रत

**विवेचन**

बिगरशेती आदेशाच्या व नकाशाच्या प्रमाणित प्रती मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री. नेमचंद तुळशीराम काळे यांनी केली होती. बिगरशेती आदेश अभिलेखात आढळ होत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, उत्तर सोलापूर यांनी श्री. काळे यांना कळविले व उर्वरित माहितीसाठी रु. १५.२० इतके शुल्क भरण्यास सांगितले. बिगरशेती आदेशाची व नकाशाची प्रत मिळालेली नाही. तसेच शुल्क भरण्याबाबत विहित मुदतीनंतर कळविले आहे, असे नमूद करुन श्री. काळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांबाबतचा नेमका तपशील जन माहिती अधिकाऱ्यांच्या पत्रात नमूद नसल्यामुळे आपण चुकीच्या अधिकाऱ्यांकडे अपील केले व त्यांनी कळविल्यानंतर योग्य अधिकाऱ्यांकडे अपील करेपर्यंत अपिलासाठी असलेली मुदत टळून गेली होती. परंतु 'विहित मुदतीत अपील न केल्यामुळे' अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ते फेटाळले. त्याविरुध्द श्री. काळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. काळे यांना पुनर्वसनाकामी मिळालेल्या जमिनीवर अतिक्रमण झाले असल्याची त्यांची तक्रार असून त्याबद्दल त्यांनी न्यायालयात दावा दाखल केला आहे. आपण मागितलेली कागदपत्रे मिळणे हे दाव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे, असे श्री. काळे यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. 'आढळ होत नाही' असे आधी कळविलेली कागदपत्रे राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल झाल्यानंतर शोध घेतला असता प्राप्त झाली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, उत्तर सोलापूर श्री. बाबासाहेब भाऊसाहेब वाघमोडे यांनी नमूद केले. तसेच श्री. काळे

यांचा अतिक्रमणाबाबतचा मूळ प्रश्नही मार्गी लागला असल्याचे त्यांनी सांगितले. श्री. काळे यांनी त्याला दुजोरा दिला.

श्री. काळे यांना मौजे ति-हे, ता. उत्तर सोलापूर येथील बिगरशेतीच्या आदेशाची प्रत व त्याच्या नकाशाची (ले - आऊट) प्रत देण्याचे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले. त्यानुसार श्री. काळे यांना ही सांक्षाकित प्रत दि. २४.९.२००७ रोजी दिल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, उत्तर सोलापूर यांनी दि. २८.९.२००७ च्या पत्रान्वये (प्राप्त दि. ५.१०.२००७) आयोगाला कळविले. श्री. काळे यांनी तसे लेखी निवेदन दिले आहे. मात्र मुद्दा क्र.तीन ची माहिती कार्यालयाकडे कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नसल्याने त्याच्या छायांकित प्रती देण्यास असमर्थ आहोत, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. काळे यांना कळविले. दोन वर्षांपासून आपण ही मागणी करीत असून ती आपल्याला त्वरित मिळावी, अशी विनंती श्री. काळे यांनी आयोगाला सादर केलेल्या दि. २८.९.२००७ ( प्राप्त दि. ८.१०.२००७) च्या निवेदनात केली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य.

२. संदर्भीय बिनशेती आदेश आज रोजी सर्व अटी व शर्ती पाळून आमलात आहे काय, याची माहिती (मुद्दा क्र.३) वस्तुस्थितीनुसार श्री. काळे यांना दिली गेली पाहिजे. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर यांनी ती त्वरित देऊन पूर्तता अहवाल आयोगाला दि. २०.१.२००८ पर्यंत सादर करावा. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, उत्तर सोलापूर यांची ही जबाबदारी राहील.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ७.१.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११००१

श्री. शंकर धाकुजी सोनवणे
एक्सल कॉर्नर, बिल्डिग नं. अे २, फ्लॅट नं.१०५,
१, गुरुवार पेठ, सेंट तेरेसा चर्चसमोर,
पुणे - ४११ ०४२

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
उप अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ६.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शंकर धाकुजी सोनवणे एक्सल कॉर्नर, बिल्डिग नं. अे २, फ्लॅट नं.१०५, १, गुरुवार पेठ, सेंट तेरेसा चर्चसमोर, पुणे - ४११ ०४२

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता (प्रभारी ), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे श्री. स.गो.आडिवरेकर

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे सौ. आर.एम. पवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.३.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.५.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. ज्येष्ठता सूची जानेवारी १९८१ ते ३१ डिसेंबर २००५ पर्यंत, प्रत्येक वर्षाच्या ज्येष्ठतेनुसार (कनिष्ठ लिपिक/वरिष्ठ लिपिक / प्रथम लिपिक) पदाची ज्येष्ठता सूचीची प्रत

२. परिमंडळ बैठक आयोजित करण्यापूर्वीची कार्यसूचीची यादी माहे फेब्रु. १९८१ ते २ मार्च २००६ पर्यंत

३. दि. २.२.१९८१ पासून ते २ मार्च २००६ पर्यंत झालेल्या परिमंडळ बैठकीचे इतिवृत्त व त्यामध्ये घेतलेल्या निर्णयानुसार मानीव तारखेच्या आदेशाच्या प्रती, १ ते ९ च्या अनुषंगाने उपरोक्त माहितीचा तपशील

## विवेचन

श्री. शंकर धाकुजी सोनवणे यांनी जेष्ठतेनुसार मानीव तारीख मिळण्यासाठी चालविलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून वरीलप्रमाणे माहिती मागितली होती. जानेवारी १९८१ ते ३१ डिसेंबर २००५ अशा प्रदीर्घ कालावधीतील ज्येष्ठतासूची, कार्यसूची अशा विविध स्वरुपाचा तपशील त्यांनी दि. १८.३.२००६ व दि.२२.३.२००६ अशा दोन अर्जांन्वये मागितला होता. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना छअंदाजे रु. २०००/- शुल्क भरण्यास कळविले. श्री. सोनवणे यांनी अंदाजे रक्कम कळविण्याला आक्षेप घेतला. मात्र २०००/- रुपये शुल्क भरणा केले. शुल्क भरल्यानंतर ४८ तासात माहिती मिळाली नाही, म्हणून श्री. सोनवणे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे यांच्याकडे अपील केले व विनाशुल्क माहिती मिळण्याची मागणी केली. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य ठरवून अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री. सोनवणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. दरम्यानच्या काळात जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. सोनवणे यांना रु. १६९०/- शुल्क झाल्याचे व भरण्यापैकी राहिलेले रु. ३९०/-

कार्यालयीन वेळेत येऊन घेऊन जावे असे कळविले. छायांकित प्रती काढण्यास वीस दिवसांचा अवधी लागेल, असेही नमूद केले.

श्री. सोनवणे हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे या कार्यालयातच वरिष्ठ लिपिक या पदावर काम करीत होते. त्यांची मुख्य मागणी पदोन्नतीसाठी मानीव तारीख मिळणेसंबंधीची असून त्या अनुषंगाने त्यांनी माहिती मागितली होती. या माहितीसंबंधी तत्कालीन व नंतर बदलले गेलेल्या जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना पाठविलेली पत्रे श्री. सोनवणे यांनी स्वीकारली नाहीत. दिलेली माहिती किंवा मानीव तारखेबाबत नेमका कोणता तपशील हवा आहे, अशा स्वरुपाची विचारणा याबाबतची पुढील कार्यवाही ही पत्रे परत आल्यामुळे श्री. सोनवणे यांच्याकडून उत्तर न मिळाल्याने होऊ शकली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे सौ. आर.एम. पवार यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. पूरक कागदपत्रे त्यांनी सादर केली. मात्र आपण एकाच कार्यक्षेत्रामध्ये व एकाच ठिकाणी कामाला असल्यामुळे व व्यक्तिशः माहिती स्वीकारणार असल्याचे अर्जात नमूद केले असल्यामुळे टपालाद्वारे माहिती स्वीकारण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तसे आपण जन माहिती अधिकारी यांना कळविले होते, असे श्री. सोनवणे यांनी नमूद केले. तत्कालीन अधीक्षक अभियंता श्री. सुधाकर गोहाड यांनी पदोन्नतीच्या संदर्भातील आपल्या माहितीच्या मागणीची अन्याय्य पध्दतीने हाताळणी केली, अशी तक्रार श्री. सोनवणे यांनी केली. श्री. सोनवणे यांना हवी असलेली सुमारे ८०० पानांची माहिती तयार असून ती त्वरित देता येईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे श्री. स.गो.आडिवरेकर यांनी स्पष्ट केले.

उभय बाजूंच्या प्रतिपादनावरून पुढील बाबी स्पष्ट होतात :

१) श्री. सोनवणे यांना अपेक्षित असलेली पदान्नती व तत्संबधीचा प्रश्न हा विषय केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही.

२) एकाच ठिकाणी अर्जदार, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी सेवेत असल्यामुळे व माहिती मागण्याच्या मूळ अर्जात श्री. सोनवणे यांनी नमूद केल्याप्रमाणे त्यांना व्यक्तिशः माहिती दिली जाणे शक्य व आवश्यक होते. त्याच बरोबर श्री. सोनवणे यांनी आलेले टपाल स्वीकारावयास हवे होते.

३)     शुल्क भरुन घेतल्यानंतर नेमकी रक्कम कळवून ऊर्वरित रक्कम परत घेऊन जाणेबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले आहे, परंतु श्री. सोनवणे यांनी ती स्वीकारलेली नाही.

४)     हव्या असलेल्या माहितीचा कालावधी व तपशील लक्षात घेता माहिती देण्यासाठी वाढीव मुदत देणे गैर नाही.

माहिती नि:शुल्क देणे आवश्यक नाही. कळविलेले शुल्क वजा जाता राहिलेली रक्कम श्री. सोनवणे यांना त्वरित द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी रु. ३९०/- चा धनादेश श्री. सोनवणे यांना पाठवून माहिती त्वरित घेऊन जाण्यास दि. १०.१०.२००७ रोजी कळविले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. ७.१.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राज दगडू परदेशी
रा.३२९, महात्मा फुले पेठ, समता भूमीजवळ,
सावित्रीबाई फुले रस्ता, पुणे-४११०४२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण,
पुणे महानगरपालिका — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६५+४८८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राज दगडू परदेशी
रा.३२९, महात्मा फुले पेठ, समता भूमीजवळ,
सावित्रीबाई फुले रस्ता, पुणे-४११०४२

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण,
पुणे महानगरपालिका श्री.प्र.म.वाघमारे

जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका श्री.मदन आढारी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.५.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>(अ)प्रमोटर, बिल्डर यांना बांधकामाला परवानगी देताना त्यांनी सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी<br>(ब)बांधकाम व्यावसायिक यांना बंधनकारक असलेल्या बांधकाम नियंत्रण नियमावलीची लेखी माहिती |
|---|---|

## विवेचन

बांधकाम व्यावसायिकांसाठी असलेल्या संपूर्ण बांधकाम नियंत्रण नियमावलीची माहिती अपलीकर्ता श्री.राज दगडू परदेशी यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता यांच्याकडून ती मिळाली नाही, म्हणून श्री.परदेशी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता यांच्याकडे अपील केले. महानगरपालिकेच्या वेबसाईटवर ही माहिती उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले, अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ते मान्य केले व श्री.परदेशी यांनी मागणी केलेली माहिती त्वरित देण्याबाबत सहाय्यक अभियंता श्री.गोडसे यांना आदेश दिले. संबंधित माहिती वेबसाईटवर उपलब्ध असल्याबाबत श्री.परदेशी यांना तसे कळविणे शक्य होते, असेही त्यांनी निकालात नमूद केले. त्यानंतर आपल्याला ही माहिती मिळाली, परंतु विहित मुदतीपेक्षा ४७ दिवस विलंबाने ती मिळाली, म्हणून जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती व्हावी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी विहित मुदतीत आदेश न दिल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करावी, अशी विनंती श्री.परदेशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात केली आहे.

बांधकाम नियमावली वेबसाईटवर उपलब्ध आहे. श्री.परदेशी यांनी मागितलेल्या माहितीत लपवण्यासारखे काहीही नाही व ही माहिती नाकारण्याचाही उद्देश नव्हता. मात्र ती वेबसाईटवर उपलब्ध असल्याचे कळविले नाही, ही चूक झाली, असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.मदन आढारी व अपिलीय प्राधिकारी श्री.प्रशांत वाघमारे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. माहिती वेबसाईटवर उपलब्ध असली तरी मागणी केल्यानुसार ती दिली जाणे आवश्यक होते, असे

प्रतिपादन श्री.परदेशी यांनी केले. आपण स्वतः संगणक निरक्षर असल्याचा उल्लेख श्री.परदेशी यांनी या संदर्भात केला.

उभय बाजूंचे निवेदन लक्षात घेता जन माहिती अधिकाऱ्यांची चूक तांत्रिक आहे. हेतुतः माहिती डावलण्याची कृती नाही, असे दिसून येते. मात्र विलंबाने दिली असतानाही माहितीसाठी रुपये ५३०/- शुल्क भरुन घेतले आहे, हे योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) वेबसाईटवर असलेल्या माहितीची प्रत (विशेषतः संगणकाचे ज्ञान अथवा सोय उपलब्ध नसणाऱ्यांनी मागितल्यास) ३० दिवसांच्या विहित मुदतीत दिली गेली पाहिजे, याची समज जन माहिती अधिकारी श्री.मदन आढारी व अपिलीय प्राधिकारी श्री.प्रशांत वाघमारे यांना देण्यात येत आहे.

(३) माहिती देण्यास झालेला विलंब तांत्रिक स्वरुपाचा व हेतुतः नसलेला असा आहे. त्यामुळे शास्ती नाही. मात्र अपीलकर्त्याकडून भरुन घेतलेले शुल्क रुपये ५३०/- दि.२०.१.२००८ पर्यंत अपीलकर्त्यास परत करावे व त्याचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी यांनी दि.२५.१.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. ८.१.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश दिनकर पुंडे
रा.३, धनदा अपार्टमेंटस्, भक्ती मार्ग,
लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे-४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय) ,
नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६६+४६७+४८२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.९.२००७ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश दिनकर पुंडे
रा.३, धनदा अपार्टमेंटस्, भक्ती मार्ग,
लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे-४

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय) ,
नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे
श्री.अंबर हिरामण पवार

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक, पुणे
श्री.चिंतामण भागुजी भुरकुंडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख<br>दि. २३.२.२००६ (अ.क्र.४६६)<br>दि. २२.२.२००६ (अ.क्र.४६७)<br>दि. ६.३.२००६ (अ.क्र.४८२) | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख<br>दि. ६.३.२००६ (अ.क्र.४६६)<br>दि. ६.३.२००६ (अ.क्र.४६७)<br>दि. ५.४.२००६ (अ.क्र.४८२) |

| ६ | प्रथम अपिलाची तारीख<br><br>दि. १३.३.२००६ (अ.क्र.४६६)<br>दि. १३.३.२००६ (अ.क्र.४६७)<br>दि. ७.४.२००६ (अ.क्र.४८२) | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख<br><br>दि. १२.४.२००६(अ.क्र.४६६)<br>दि. २.५.२००६ (अ.क्र.४६७)<br>दि.२.५.२००६ (अ.क्र.४८२) |
|---|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>**अपील क्र.४६६/पुणे**<br>दुय्यम निबंधक हवेली क्र.४ यांच्या कार्यालयात श्री.गोडांबे नावाच्या व्यक्तीचा हस्तक्षेप होता, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या तपासणीत आढळले. असा हस्तक्षेप किती दिवसापासून चालू आहे याची शहानिशा केली का, नसल्यास का नाही? श्री.गोडांबे यांच्या विरोधात पोलिसात तक्रार का नोंदवली नाही? श्री.गोडांबे यांनी सह्या करुन दिलेल्या पावत्या संबंधित नागरिकांसाठी अधिकृत आहेत किंवा कसे? अधिकृत आहेत तर तसे निवेदन दैनिक वर्तमानपत्रात का देण्यात आले नाही? श्री.गोडांबे यांचे पूर्ण नांव व पत्ता काय आहे?<br>**अपील क्र.४६७/पुणे**<br>(१)प्रत्यक्ष नोंदणी महानिरीक्षकांनांच एका व्यक्तीने मोबाईलद्वारे दु.नि.हवेली-४ या कार्यालयात काम कसे चालते याची माहिती दिली? ही व्यक्ती कोण आहे?<br>(२)सदर व्यक्तीने 'प्रत्यक्ष काम कसे चालते' याची काय माहिती दिली होती?<br>(३)मुख्यालयाच्या कोणत्या अधिकाऱ्याने दु.नि.हवेली-४ यांच्या कार्यालयाला अचानक किती वाजता भेट दिली?<br>(४)अचानक भेट दिली त्यावेळी दुय्यम निबंधक कार्यालयात हजर होते का? नसल्यास ते कुठे होते?त्यांना काही कार्यालयीन कामकाजासाठी बाहेर पाठवले होते का?<br>(५) दु.नि.हवेली-४ यांच्या कार्यालयात श्री.गोडांबे नावाची व्यक्ती वावरत असून पक्षकारांना दिल्या जाणाऱ्या या पावतीवरही ती व्यक्ती सह्या करते आणि पक्षकारांकडे पैसेही मागते ह्या माहितीची सत्यता/असत्यता कशा प्रकारे तपासली ?<br>(६) श्री.गोडांबे या अनधिकृत व्यक्तीने लिहिलेल्या ६२ पावत्या व सह्या केलेल्या २१ पावत्या शासन रद्द ठरविणार आहे का? सदर बातमीत ज्या २१ पावत्यांवर श्री.गोडांबे यांच्या सह्या आढळल्या तया पावत्यांच्या छायाप्रती<br>(७)श्री.गोडांबे सारख्या अनेक व्यक्ती पुण्यातील बहुतेक दुय्यम निबंधकांच्या कार्यालयात अनेक वर्षांपासून ठिकठिकाणी कार्यरत आहेत हे आपल्या निदर्शनास सन १९९५ पासून सातत्याने आणत आहे, त्यांच्यावर आपल्या कार्यालयाने कार्यवाही का केलेली नाही?उदा.हवेली-९ येथे सुट्टीच्या दिवशी अनधिकृतपणे कार्यालय उघडून काही वकिलांसमवेत आपला शिपाई दस्त हाताळत होता हे मी उपनोंदणी महानिरीक्षक, श्री.पवार यांना फोनवरुन कळवले होते. तसेच श्री.कदम (सद्या निलंबित) हे हवेली-२ या कार्यालयात काही महिन्यांपूर्वी प्रभारी दुय्यम निबंधक म्हणून काम करीत असताना त्यांनी चालवलेल्या गैर व ठिसूळ कारभाराविरुध्द जिल्हा सहनिबंधकांकडे दि.३.१२.२००५ रोजी लेखी तक्रार केली होती व दोन स्मरणपत्रेही दिली होती. त्यांनी अतिरिक्त लाभापोटी काहीही ॲक्शन घेतली | |

| |
|---|
| नाही. त्यानंतर आयजीआर यांनी सदर बातमीत केलेल्या अवाहनाला प्रतिसाद म्हणून सदर तक्रार दि.१९.१.२००६ रोजी आपणाकडे फॅक्स केली तरीही काही कार्यवाही का झाली नाही? <br> **अपील क्र.४८२/पुणे** <br> (१)आपल्या खात्याकडे माहितीच्या कालावधीमध्ये दिमतीस असलेल्या शासकीय वाहनांचे नोंदणी क्रमांक व सदर वाहने कोणत्या अधिकाऱ्यांच्या दिमतीला कधीपासून आहेत. <br> (२)सदर वाहनांमध्ये भरल्या जाणाऱ्या इंधनाची बिले कोण व कशा प्रकारे चुकती करतात. <br> (३)सर्व वाहनांच्या दैनंदिन वापराच्या नोंदी ठेवलेल्या लॉग बुकाच्या माहितीच्या कालावधीतील नोंदीच्या छायाप्रती. <br> (४)वाहनापैकी कोणत्या वाहनांना कुठला (लाल/अम्बर) डोमलाईट अनुज्ञेय आहे. |

## विवेचन

नोंदणी महानिरीक्षक कार्यालयातील कामकाजासंबंधी वृत्तपत्रात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री.रमेश दिनकर पुंडे यांनी वरीप्रमाणे माहिती मागितली होती.

अपील क्र.४६७/पुणे मुद्दा क्र.१ व २ मधील माहिती विश्वासाश्रित संबंधामुळे उपलब्ध झाली असल्याचे नमूद करुन कलम ८(१)(ङ) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी नाकारली. मुद्दा क्र.३ ते ६ ची माहिती दिली. मुद्दा क्र.७ हा कार्यवाहीचा विषय असल्याने त्यावर स्वतंत्ररीत्या कार्यवाही सुरु करण्यात आल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. जन माहिती अधिकाऱ्यांनी वस्तुस्थितीदर्शक व उक्त अधिनियमास अनुसरुन दिलेले उत्तर योग्य आहे, असे नमूद करुन अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक श्री.अंबर पवार यांनी श्री.पुंडे यांचे अपील फेटाळले. त्याविरुध्द त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या उत्तरानुसार वृत्तपत्रातील बातमी खोटी ठरते. श्री.गोडांबे नावाची अनधिकृत व्यक्ती नोंदणी महानिरीक्षक कार्यालयात सह्या करुन पावत्या देणे, सह्या करुन पैसे मागणे इ. कामे करते, असे बातमीत म्हटले आहे. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तरात अशी कोणतीही व्यक्ती काम करीत नसल्याचे नमूद केले आहे. श्री.यू.टी.म्हेत्रे या एकाच दुय्यम निबंधकाला बदनाम करण्यासाठी एकाच वर्तमानपत्र प्रतिनिधीला बोलावून घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बातमी दिली. तसेच नोदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय) श्री.अंबर पवार यांनी कार्यालयास भेट दिली तेव्हा श्री.गोडांबे हजर होते, मग त्यांना पोलिसात का दिले नाही, असा प्रश्न श्री.पुंडे यांनी आयोगापुढील सुनावणीत उपस्थित केला. परंतु आपण भेट दिली तेव्हा श्री.गोडांबे तेथे

नव्हते. एकाच वृत्तपत्र प्रतिनिधीला बोलावून बातमी दिली गेली नाही, श्री.म्हेत्रे त्या दिवशी रजेवर होते व कार्यभार श्री.व्ही.एस.कदम यांच्याकडे होता. श्री.म्हेत्रे, श्री.कदम यांच्यासह चार अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले, असे श्री.पवार यांनी नमूद केले. सह्यांच्या अधिकृततेबद्दल नागरिकांच्या मनात शंका असल्यामुळे वृत्तपत्रात खुलासा करणे आवश्यक होते, हे श्री.पुंडे यांचे म्हणणे श्री.पवार यांनी मान्य केले व त्यावेळी वृत्तपत्रात खुलासा करण्याचे राहून गेले, असे सांगितले. आपण केलेल्या तक्रारीचे पत्र दि.१९.१.२००६ चे असताना ते दि.२३.२.२००६ ला मिळाले, हा जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तरात केलेला उल्लेख चुकीचा आहे. आपण दि.१९.१.२००६ रोजी पत्र फॅक्स केले होते, ते मिळाल्याची खात्री करुन घेतली होती, असे नमूद करुन श्री.पुंडे यांनी त्या दिनांकाची फॅक्स केल्याची पावती दाखवली. याबाबत श्री.पवार समाधानकारक स्पष्टीकरण करु शकले नाहीत. मात्र संबंधित तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

**निष्कर्ष :**

(१) जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.पुंडे यांच्या अर्जानुसार माहिती दिली आहे. वर्तमानपत्रातील बातमी खरी की खोटी, यासारखे निष्कर्षाची मागणी करणारे प्रश्न 'माहिती ' च्या व्याख्येत बसत नाहीत.

(२) ८(१)(ङ)कलमाचा चुकीचा अन्वयार्थ जन माहिती अधिकाऱ्यांनी लावला. विश्वासाश्रित संबंधामुळे मिळालेली माहिती देता येत नाही, हे त्यांचे उत्तर फारतर संबंधित व्यक्तीचे नाव उघड करण्यासंबंधात लागू करता येईल, परंतु या व्यक्तीने दिलेली माहिती विश्वासाश्रित संबंधामुळे प्राप्त झाली आहे, असे गृहीत धरले तरी ती सार्वजनिक महत्त्वाची असल्यामुळे काय माहिती दिली हे कळविणे आवश्यक होते.

**अपील क्र.४६६/पुणे**

श्री.गोडांबे नावाच्या व्यक्तीच्या संदर्भातच हे अपील आहे. अशा अनधिकृत व्यक्तीचा दुय्यम निबंधक क्र.४ यांच्या कार्यालयात थेट हस्तक्षेप होता, हे सिध्द होते, असे नमूद करुन श्री.पुंडे यांनी पाच.मुद्द्यांची माहिती मागितली. मुद्दा क्र.१ च्या संदर्भात तपासणीचे निर्देश दिले असल्याचे, तसेच मुद्दा क्र.३ व ४ संदर्भात श्री.गोडांबे यांनी सह्या केल्याचे दिसून आले नसल्यामुळे पावत्या अनधिकृत ठरवता येत नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले. मुद्दा क्र.२ केंद्रिय माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ कलम २ (च) नुसार 'माहिती ' च्या व्याख्येत समाविष्ट होत नाही व मुद्दा क्र.५ मध्ये विचारल्याप्रमाणे श्री.गोडांबे यांचे नाव व पत्ता उपलब्ध नाही, असे माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केले. श्री.पुंडे यांनी या उत्तराच्या अनुषंगाने दाखल केलेल्या अपिलात आणखी अनुषंगिक माहितीची मागणी केली आहे. तपासणी करण्याचे निर्देश कोणाला व कधी दिले, किती दिवसात अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या, याची माहिती दिली नाही, असे नमूद करुन त्यांनी दिलेल्या निर्देशाची छायांकित प्रत मागितली. श्री.गोडांबे यांनी सह्या केल्याचे दिसून आले नाही, हे उत्तर खरे असले तर, वर्तमानपत्रात छापून आलेली बातमी खोटी ठरते. या एकमेव वर्तमानपत्राला अशी खोटी बातमी कोणी व केव्हा दिली, वार्ताहराला बोलाविण्यात आले होते की खात्याने स्वत:हून बातमी प्रसिध्दीस दिली, या स्वरुपाचे विविध प्रश्न श्री.पुंडे यांनी प्रथम अपिलासोबत सादर केलेल्या निवेदनात विचारले आहेत. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांचे अपील फेटाळले, त्यामुळे श्री.पुंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. श्री.गोडांबे यांचा पत्ता तेव्हा उपलब्ध नव्हता, आता तो देता येईल, असे अपिलीय प्राधिकारी श्री.अंबर पवार यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. हा पत्ता उपलब्ध होताच श्री.पुंडे यांना देणे आवश्यक होते.

**अपील क्र.४८२**

मोजणी व मुद्रांक कार्यालयाच्या शासकीय वाहनांच्या दि.१ जानेवारी, २००० ते ३१ जानेवारी २००६ या काळातील वापराबाबतचा तपशील श्री.पुंडे यांनी मागितला होता. ही माहिती देण्यासाठी ३० दिवसांच्या विहित मुदतीपेक्षा अधिक कालावधी लागणार असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.ए.एम.पिंचाणी यांनी ही माहिती दिलीच नाही म्हणून श्री.पुंडे यांनी अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अपील केले. विविध कार्यासनांकडून माहिती मागवून व संकलित करुन द्यावी लागणार असल्यामुळे या प्रक्रियेस कालावधी लागणार आहे, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर वस्तुस्थितीदर्शक असल्याचे नमूद करुन अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक श्री.अंबर पवार यांनी 'शासकीय माहिती अधिकाऱ्यांनी शक्य तितक्या लवकर याबाबत निर्णय घ्यावा', असे आदेश दिले.

अपिलीय प्राधिकाऱ्यांचा हा निर्णय नेमकेपणाने आदेश देणारा नाही व या निर्णयानंतरही जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही, असे प्रतिपादन श्री.पुंडे यांनी आयोगापुढील सुनावणीत केले.

विविध कार्यासनांकडून माहिती मागवून सहा वर्षांच्या काळातील संबंधित माहिती देणे आवश्यक होते व त्या दृष्टीने तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी कार्यासन क्र.७ व कार्यासन क्र.१३ यांना केलेली माहिती देण्याची सूचना, त्याबाबतची स्मरणपत्रे आदींच्या प्रती अपिलीय प्राधिकारी श्री.पवार यांनी आयोगाला सादर केल्या. दि.५.७.२००६ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांनी कार्यासन क्र.१३ यांना माहिती एकत्रित करुन श्री.पुंडे यांना देण्यास कळविले. त्यानंतर या नस्तीवर विशेष कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.पिंचाणी हे दि.३१.३.२००७ रोजी सेवानिवृत्त झाले. कार्यासन क्र.९ हे पदसिध्द जन माहिती अधिकारी असून श्री.पिंचाणी यांच्या निवृत्तीमुळे कार्यासन क्र.६ श्री.सी.बी.भुरकुंडे यांच्याकडे माहिती अधिकारी पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. श्री.पुंडे यांनी प्रामुख्याने वाहन क्र.७७७ या एका वाहनासंबंधीची माहिती दि.१७.४.२००७ च्या अर्जाअन्वये मागितली होती. तसेच 'या अपिलाचे निमित्ताने जुन्या अर्जाच्या सर्व बाबी समोर आल्या आहेत आणि त्यानुसार इतर कार्यासन अधिकारी यांचेकडून युध्दपातळीवर सर्व प्रयत्न करुन दि.१७.९.२००७ पर्यंत सर्व माहिती उपलब्ध करुन घेऊन श्री.पुंडे यांना देण्याची सध्याचे माहिती अधिकारी श्री.भुरकुंडे हमी देत आहेत,' असे श्री.पवार यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. मात्र वाहन क्र.७७७ बाबत वेगळा अर्ज होता व ती माहिती आपल्याला मिळाली आहे, अपील क्र.४८२ चे संदर्भात अर्ज दि.६.३.२००६ चा होता व त्याबाबतची कोणतीही माहिती मिळालेली नाही, असे श्री.पुंडे यांनी स्पष्ट केले. श्री.भुरकुंडे यांनी ती प्राप्त करुन विहित मुदतीत श्री.पुंडे यांना दिली,

श्री.पवार यांनी नमूद केलेल्या हमीनुसार संपूर्ण माहिती दि.१७.९.२००७ पर्यंत द्यावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले होते. परंतु या मुदतीत परिपूर्ण माहिती दिली गेली नाही. लॉग बुकाबाबतची जवळजवळ ३५ ते ४० वाहनांची माहिती अपेक्षित असून जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयातील फक्त तीन वाहनांबाबतची व तीही अपिलामध्ये माहिती पुरविली आहे, असे श्री.पुंडे यांनी दि.२०.९.२००७ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले.

आयोगाने केलेल्या विचारणेनंतर जन माहिती अधिकारी श्री.भुरकुंडे यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात पुढील मुद्दे मांडले आहेत :

(१) श्री.पुंडे यांनी दि.६.३.२००६ रोजी अर्ज करुन केवळ नोंदणी महानिरीक्षक कार्यालयातील वाहन क्र.७७७ चीच माहिती मागितली होती. ती विहित मुदतीत पुरविण्यात आली. त्यावेळी त्यांनी पूर्वी केलेल्या अर्जान्वये अर्जातील सर्व वाहनांची माहिती मागितली असल्याचे व ती आवश्यक असल्याचे सांगितले नव्हते. त्यावेळी त्यांच्या इतर पत्रव्यवहाराचा रोख केवळ वाहन क्र.७७७ वरच होता. ती माहिती दिली असल्याने तो संपूर्ण विषय बंद झाला असल्याची या कार्यालयाची धारणा झाली होती.

(२) मात्र दि.७.९.२००७ रोजी राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी दि.६.३.२००६ रोजी केलेल्या अर्जाचे अनुषंगाने म्हणजेच साधारण दीड वर्षापूर्वी केलेल्या अर्जाचे अनुषंगाने उपनोंदणी महानिरीक्षक (मुख्यालय) कार्यालयातील वाहनांबरोबरच राज्यातील सर्व कार्यालयांमध्ये वापरात असलेल्या वाहनांच्या माहितीची आवश्यकता असल्याचे श्री.पुंडे यांनी प्रतिपादन केले. त्यावेळी मुख्य माहिती आयुक्त यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले. पुढे सुनावणीनंतर नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय) या कार्यालयातील ३ वाहनांची माहिती लगेच तयार करण्यात आली व ती श्री.पुंडे यांना दि.११.९.२००७ चे पत्रान्वये देण्यात आली.

(३) तदनंतर नोंदणी महानिरीक्षक कार्यालयातील वाहनांविषयी बाबीचा या कार्यालयातील संबंधित कक्षाकडे पाठपुरावा करुन राज्यात एकूण किती वाहने आहेत याची माहिती उपलब्ध करुन घेण्यात आली.

(४) त्यांनी दिलेल्या माहितीनुसार माहितीच्या कालावधीत राज्यात एकूण ४३ वाहने असल्याचे सांगितले व त्यापैकी १२ वाहने निर्लेखित केली आहेत. त्यानंतर सर्व संबंधित क्षेत्रीय कार्यालयांना या कार्यालयाचे पत्र क्र.१५४१ ते ७२, दि.१९.९.२००७ अन्वये वाहनांच्या वापराबाबतची माहिती व लॉग बुकच्या प्रती एक आठवड्याचे आत उपलब्ध करुन देण्याबाबत कळवून वेळोवेळी दूरध्वनीवरुन पाठपुरावा करण्यात आला.

(५) तद्नंतर दि.११.१०.२००७ रोजी राज्यातील प्राप्त झालेल्या २ कार्यालयांच्या वाहनांच्या वापराविषयीची माहिती व लॉग बुकच्या प्रती श्री.पुंडे यांना दि.५.१०.२००७ चे पत्रान्वये देण्यात आली.

(६) अशा रीतीने आतापर्यंत श्री.पुंडे यांना राज्यातील वेगवेगळ्या कार्यालयातील २२ वाहनांची माहिती व लॉग बुकच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. ऊर्वरित वाहनांच्या माहतीसाठी संबंधित कार्यालयांकडे सातत्याने पाठपुरावा सुरु आहे व ती माहिती उपलब्ध होताच श्री.पुंडे यांना उपलब्ध करुन देण्यात येईल, असेही श्री.पुंडे यांना कळविण्यात आले आहे.

श्री.भुरकुंडे यांनी परिच्छेद क्र.१ व २ मध्ये केलेली विधाने वस्तुस्थितीशी विसंगत आहेत. वाहन क्र.७७७ च्या संदर्भातील पत्र दि.१७.४.२००७ चे असल्याचे व ही माहिती दिलेली असल्याचे अपिलीय प्राधिकारी श्री.अंबर हिरामण पवार यांनी सादर केलेल्या निवेदनातच नमूद केलेले आहे व ती माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्त्याने मान्य केलेले आहे. दि.६.३.२००६ च्या अर्जातील मागणी अत्यंत स्पष्ट आहे. श्री.पुंडे यांनी सर्व वाहनांची माहिती आयोगापुढील सुनावणीतच मागितल्याचे श्री.भुरकुंडे यांचे परिच्छेद क्र.२ मधील निवेदन दि.६.३.२००६ चा अर्ज त्यांनी बारकाईने वाचला नसल्याचे स्पष्ट करते. मात्र त्याच वेळी खात्याकडील सर्व वाहनांची माहिती मिळवून देण्याबाबत विविध संबंधित अधिकाऱ्यांशी त्यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रतीही त्यांनी सादर केल्या आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील क्र.४६६ व ४६७ अमान्य.

(२) अपील क्र.४८२ मान्य.

(३) अपील क्र.४८२ मधील कोणतीही माहिती तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत दिलेली नाही, मात्र संबंधित कार्यासनाकडे त्यांनी त्याबाबत पाठपुरावा केल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येते. या स्थितीत माहिती न देण्यास संबंधित कार्यासनांचे प्रमुख केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५(५) मधील तरतुदीनुसार माहिती अधिकारी

म्हणून जबाबदार ठरतात. विद्यमान माहिती अधिकारी श्री.भुरकुंडे यांनी आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे नमुद केलेल्या मुदतीत माहिती न देण्यास तेही जबाबदार ठरतात. दि.६.३.२००६ रोजी अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती दीड वर्ष उलटून गेले तरी दिली गेली नाही, त्यामुळे सर्व संबंधितांना मिळून रुपये २५,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य श्री.रामराव शिनगारे यांनी याबाबतची संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन त्यानुसार शास्तीची विभागणी करावी व जानेवारी २००८ च्या संबंधितांच्या वेतनातून ती वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करावी. त्यांनी केलेली जबाबदारीची निश्चिती व शास्तीची विभागणी नोंदणी महानिरीक्षक यांनी दि.२० जानेवारी २००८ पर्यंत आयोगाला कळवावी व शास्तीची वसूली केल्याच्या पूर्ततेचा अहवाल दि.१० फेब्रुवारी २००८ पर्यंत आयोगाला सादर करावा. तसेच संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात या शास्तीबाबतची नोंद घेण्यात यावी व त्याचाही अहवाल आयोगाला वरील दिनांकापर्यंत सादर करावा. प्राधिकरण प्रमुख म्हणून नोंदणी महानिरीक्षक यांची ही जबाबदारी राहील.

(३) आयोगापुढे विशिष्ट मुदतीत माहिती देण्याचे कबूल केल्यानंतर त्यानुसार कार्यवाही पूर्ण होण्याची दक्षता अपिलीय प्राधिकारी तथा उपनोंदणी महानिरीक्षक (मुख्यालय) श्री.अंबर हिरामण पवार यांनी घेणे आवश्यक होते. यापुढे आदेशाच्या कार्यवाहीबाबत दक्षता घेण्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. ८.१.२००८**